# भारतातील उच्च शिक्षण वास्तव आणि दिशा

**प्रा. डॉ. इलियास जी. बेपारी**
आठवले कॉलेज ऑफ़ सोशल वर्क, भंडारा,
महाराष्ट्र. **भारत**

**गोषवारा :—**

भारतातील उच्चषिक्षण ही जागतिक संदर्भात दुसरी मोठी व्यवस्था आहे. परंतु एल. पी. जी. च्या मुक्त व्यापारक्षेत्रात षिक्षणाचा सुध्दा व्यापार सुरू झाला. षिक्षणाचे बाजारीकरण सुरू झाले अषा परिस्थितीत समाजातील जे वर्ग सुरूवातीपासूनच उपेक्षीत व दुर्लक्षित राहिले होते ते आता कोठे तरी उच्चषिक्षण घेत आहे. परंतु नवीन प्रकारच्या खाजगी विद्यापीठाच्या कायदयामुळे व सरकारच्या नाकर्तेपणामुळे म्हणा षिक्षण हि काहिच लोकांची मिरासदारी होवू पाहत आहे. त्यामुळे आहे रे नाही रे मधील दरी आणखी वाढत जाणार आहे त्यामुळे जुनीच स्तरीकरण व्यवस्था नवीन रूपात प्रस्थापित होवू पाहत आहे. त्यामुळे कल्याणकारी राज्याची संकल्पना सुध्दा पायदळी तुडविली जात आहे. जाणार आहे.

**प्रस्तावना:—**

उच्चशिक्षण हे शिक्षण रचनेतील शिखर होय. एकविसाव्या शतकात प्रवेश करण्याच्या जाणिवेने भविष्याचा वेध घेतांना एका बाजुला माहितीचे महाजाल, इंटरनेट,वैश्विकीकरण,माहितीचा विस्फोट, सर्वच क्षेत्रांचे संगणकीकरण ही क्षितिजे खुणवतांना दिसतात. एकविसाव्या शतकाची आणि शिक्षणाची सुसंगती लावतांना स्वामी विवेकांनंदानी शतकापूर्वी दिलेला मूलतंत्र विचारात घेणे योग्य होईल, भारतीय शिक्षणाची कोणतीही समस्या सोडविण्यासाठी अत्यंत आवश्यक गोष्ट जर कोणती असेल तर ती म्हणजे शिक्षकाच्या दैनिक सामान्य कार्याचा अनुभव आणि यासाठी विद्यार्थ्याच्या दृष्टितून जगाकडे पाहण्याची दृष्टि याचा अर्थ विद्यादर्याची म्हणजेच त्यांची पर्यायाने समाजाची गरज असते.

जीवनप्रणालीतून शिक्षणप्रणाली विकसित होते व शिक्षणप्रणालीतून जीवनाला ज्ञान,कौशल्य, अभिरूची चैतन्य प्राप्त होते. गांधीजीना अपेक्षित शरीर , बुध्दी यांचा समतोल विकास व माणूस निर्माण करणे हे विवेकानंदाचे स्वप्न होते. एकविसाव्या शतकातील शिक्षणाला सात्विकता देत असताना योग्य परिवर्तने घडवावी लागतील

**नवीन शैक्षणिक धोरणात उल्लेख केल्याप्रमाणे ( U.G.C. 1978-1985 ) :—**

विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या घोषणापत्रात १९७८ मध्ये भारतातील उच्च शिक्षणात प्रगती व १९८५ मध्ये शिक्षण क्षेंत्रातील आव्हाने यामध्ये शिक्षणात व शिक्षणपध्दतीत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याची शिफारस केली.

Higher Edication provides people with an opportunity to reflect to reflect on the Critical, social, Economics, Cultural, Moral and spiritiual issues facing humanity it contributes to the national development throught dissemination of specialized knowledge and skills. It is therefore a crucial factor for serviva.Being at the apex of educational pyramid, it has also a key role in producing teachers for education system.

म्हणून एकविसाव्या शतकात पदार्पन करतांना महत्वाची गरज आहे गुणात्मकता व नवे प्रश्न याबददल अंतर्मुख होण्याची.

**शिक्षण पध्दतीत बदल आवश्यक — डॉ मुणगेकर**

सध्याची शिक्षण पध्दती कुचकामी ठरत चालली असून आगामी काळात उच्चशिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करावे लागणार आहे. जागतिकीकरणाच्या नव्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी विद्यार्थ्यांना सामान्य शिक्षणासोबतच व्यावहारिक आणि व्यावसायभिमुख शिक्षण देणे आवश्यक बनले आहे.

**उच्च शिक्षणाच्या संदर्भातील वास्तव :–**

उच्च शिक्षणाची भारतातील व्यवस्था ही जागतिक संदर्भात तुलना करता फार मोठी आहे. १९४७ च्या तुलनेत विद्यार्थ्यांची संख्या झपाटयाने वाढत आहे. १९४७ ला विद्यापीठांची संख्या २० होती ती २००१ मध्ये २५६ झाली. महाविद्यालये आर्टस व सायन्स ४५९ व्यावसायिक १३२ होती ती अनुक्रमे १२६९५, ४३८४ ( इजी, मेडीकल, पॉलीटेक्नीकल अनुक्रमे ७७८, १२३१, १३७५ ) झाली असून विद्यार्थी संख्या ही २००१ नुसार ५८,९८,४०७ झाली आहे.

परंतु प्रचलित शिक्षण विस्तार व स्वरूप लक्षात घेता काही गोष्टी लक्षात येतात. परीक्षा पध्दती व त्याच्यांशी निगडीत वर्षाचे नियोजन आयोजन याच्याच गुंत्यात अडकल्यामुळे आपले ज्ञान व कौशल्य विस्तारावर संकुचित लक्ष राहीले आहे. इकडे ज्ञानाचा विस्फोट होत आहे परंतु हात, ह्रदय, व मेंदू यांच्यात समन्वय राहिला नाही.

विकासाच्या आधी निर्वाह ही पहिली गरज आहे. विद्यार्थ्याला किमान निर्वाहापुरते कौशल्य देणारे शिक्षण हवे, कारण राष्ट्राची एकात्मता नागरिकाच्या ताठ मानेवर अवलंबून असते. व मान ताठ असण्यासाठी पोट भरलेले असावे लागते, परंतु विद्यमान उच्चशिक्षणातून असे होतांना दिसत नाही. त्यामुळेच सुशिक्षित बेकारांच्या संख्येत दिवसेदिवस वाढ होताना दिसते त्यातूनच गुन्हेगारी, आत्महत्या अशा सारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. **मुणगेकर**

वर उल्लेख केल्याप्रमाणे एवढा मोठा शिक्षणाचा विस्तार असतांनाही १७ ते १४ या वयोगटातील फक्त ७ % नवीन आकडेवारी एवढेच तरूण उच्चशिक्षण घेत आहे . हे प्रमाण विकसित व विकसनशिल राष्ट्राच्या मानाने फार कमी आहे.

| **देश** | **प्रमाण** |
|---|---|
| इंडोनेशिया | १० % |
| ब्राझील | १२ % |
| थायलंड | १९ % |
| मेक्सिको | १४% |
| फ्रान्स | ५० % |
| अमेरिका | ८१ % |
| यु. के. | ३० % |
| कॅनडा | ९९ % |

असे आहे.

उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या खर्चाच्या ९०% खर्चाचा भार भारत सरकार आपल्या सार्वजनिक क्षेत्रातील एकूण खर्चाच्या तरतूदीतून करीत होते. परंतु १९९१ पासून सरकारचे उच्च शिक्षणाच्या खर्चाच्या संदर्भातील धोरण बदलत आहे. उच्चशिक्षणावरील खर्चास केंद्र सरकारने सुरूवातीपासून अग्रक्रम दिला. परंतु त्याचा लाभ मात्र कमी जणांना मिळाला. आर्थिक धोरण ठरविणाऱ्यांच्या हे लक्षात आले. त्यामुळे प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्याने मिळणारे लाभ जे विदयार्थी संखेत मोजले जातात. ते उच्च शिक्षणापेक्षा अधिक आहेत हे सरकारने जाणले. थोडक्यात उच्च शिक्षणावर होणारा प्रचंड खर्च आणि त्या तुलनेत विदयार्थी संख्या कमी उलट प्राथमिक शिक्षणावर खर्च तुलनेने कमी पण शिकणाऱ्या विदयार्थ्यांची संख्या फार मोठी आहे. हा अनुभव अभ्यासून हळूहळू सरकार उच्च शिक्षणासाठीच्या खर्चाबददल आखडते धोरण व दुर्लक्ष करीत आहे. अशी वस्तु स्थिती जाणवत आहे.

**भारतातील उच्च शिक्षणाची दिशा :–**

भारतातील उच्च शिक्षणाची दिशा जागतिकीकरणाच्या संदर्भात झपाटयाने परिवर्तीत होत आहे. जागतिकीकरणाने जगातील राष्ट्रे इतकी जवळ आलेली आहेत की, एखादे तंत्र, माहिती, शोध आणि विचार हा परस्परांचे जात राहतो. त्यांची स्विकृती व वापर होवू लागतो. सांस्कृतिक संलग्नीकरण सुध्दा ग्लोबलायझेशनमुळे वाढलेले आहे. परिणामी काही विशिष्ट कौशल्ये व जीवनशैलीचे आत्मसातीकरण अपरिहार्य ठरले आहे. त्यासाठी उच्च शिक्षणाची आवश्यकता आहेत.

परंतु सरकार मात्र दिवसेंदिवस अर्थिक कारण पुढे सांगूण आपल्या पंचवार्षिक योजनामध्ये सकल परेलू उत्पादनाच्या फक्त २.८७ % एवढेच पैसे उच्च शिक्षणावर खर्च करीत आहे. प्रा. डॉ. अमर्त्य सेन म्हणतात, शिक्षणातील खर्च उत्पादक गुंतवणूक आहे व मानवी विकासामध्ये शिक्षणाला महत्वाचे स्थान आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६% आणि शक्य झाल्यास १०% उत्पन्न शिक्षणावर खर्च झाले पाहिजे, तेव्हाच सर्वांना परवडेल असे गुणवतापूर्ण शिक्षण या ध्येयाच्या दिशेने टाकलेले पाऊल साध्य होवू शकेल .मात्र त्याही पुढे जाऊन सर्वासाठी तंत्रज्ञान आणि सर्वांना परवडेल अशा शुल्कात गुणवतापूर्ण शिक्षण या दोन महत्वपूर्ण गरजांकडे अर्थसंकल्पात पुरेसे लक्ष देण्यात आले नाही.

### खासगी विद्यापीठ कायदा व उच्च शिक्षणाची दिशा :-

माजी राज्यपाल म्हणजेच राज्यातील उच्च शिक्षणाचे प्रमुख असलेले कुलपती महंमद फजल यांची कारकिर्द अनेकार्थाने गाजली. त्यांनी काढलेल्या फतव्यांमुळे राज्यातील शिक्षणक्षेत्रामध्ये कंपने उठली असून पुढील काही काळ तरी ती राहणार आहे. १६ ऑगस्ट २००४ रोजी स्वयंअर्थसहायित विद्यापीठांचा अध्यादेश (खाजगी विद्यापीठ ) कुलपती फजल यांनी काढला आणि गेल्या सरकारने सतेच्या अखेरच्या दिवशी तो जारी केला. गॅटस ची तयारी म्हणून खासगी विद्यापीठ सुरू करणे आवश्यक आहे, असा दावा करण्यात आला पण, गॅटसची अंमलबजावणी आणखी दीड दोन वर्ष होणार नाही. वास्तविक इतक्या घाईगडबडीने आणि चोरी छुपे असा अध्यादेश काढण्याची काहीच गरज नव्हती. परंतु राज्यातील काही बडया मंडळीना खासगी विद्यापीठाच्या अनुषंगाने येणारे केंद्राचे आणि पर्यायाने विद्यापीठ अनुदान आयोगाचे नियंत्रण नको आहे यामुळेच नविन कायदयाचा घाट घालून तो मंजूर करून घेतला जेणेकरून हया बडया प्लेअर्सना विद्यार्थ्याकडून अव्वाच्या सव्वा रूपये डोनेशन म्हणून वसूल करता येतो म्हणून खाजगी विद्यापीठे म्हणजे मुलींना आणि विशेषत: अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय मुलांतील आर्थिकदृष्टया पण हुशार मुलांना उच्च शिक्षणाचे दालन बंद करण्याकडे वाटचाल होणारे आणखी एक पाऊल ठरणार आहे. खासगी विद्यापीठांमुळे आहे रे आणि नाही रे मधील दरी अधिक वाढणार आहे अशी भिती व्यक्त होत आहे.

खाजगी विद्यापीठांचे विधेयक म्हणजे उच्च शिक्षण क्षेत्राचे पालकत्व स्विकारण्यास शशासन अपयशी ठरले आहे. हे याचेच निदर्शक आहे. शिक्षणाचे भले करण्याचे, सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे शासनाकर्त्याच्या मनात खरेच असते तर त्यासाठी प्रचलित व्यवस्थेमध्येही अनेक पर्याय उपलब्ध आहेत. प्रस्थापित विद्यापीठे अधिक बळकट करून स्वायतेतेची योजना खऱ्या अर्थाने राबविण्यासारखा पर्याय त्यांच्यापुढे होता. विनाअनुदानित शिक्षण संस्थातून विद्यार्थी कसा भरडला जातो याचे उदा. आपण दरवर्षी वैद्यकीय,शिक्षण,अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेदरम्यान पाहतोच या संख्या म्हणजे खाजगी विद्यापीठांचे बोन्सायच आहेत. या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या चराऊ कुरणांवर लक्ष केंद्रित करूनच खासगी विद्यापीठांचा घाट घालण्यात आला आहे. शिक्षणाच्या विकासासाठी तो कसा आवश्यक आहे. याचे मार्केटिंग आता करण्यात येईल. सामाजिक न्याय, समतेच्या आणाभाका घेतल्या जातील आणि सुरू होईल या विद्यापीठांची प्रवेश प्रक्रिया नव्हे, प्रवेशाचा लिलाव अर्थात उच्च शिक्षण ही काहिच लोकांची मिरासदारी होईल.

### दर्जेदार शिक्षण विद्यार्थांना कां मिळत नाही याची कारणे :-

१. आर्थिक विषमतेमुळे विद्यार्थ्यात गुणवत्ता असूनही उच्च शिक्षण प्राप्त करू शकत नाही.
२.ग्रामीण भागातील अशिक्षित पालकाचा शिक्षणाकडे पाहण्याच्या उदासीन दृष्टिकोन.
३.विद्यापीठात राजकीय हस्तक्षेप वाढत आहे व त्यांना संपूर्ण स्वायत्ता दिलेली नाही.
४.महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा मुल्यांकन करण्याचा पध्दतीचा अभाव .
५.सरकारचा उच्च शिक्षणापेक्षा प्राथमिक शिक्षणावर असलेला भर.
६.सरकार उच्च शिक्षण देणे ही स्वत:ची जबाबदारी समजत नाही.

**निष्कर्ष :–**

१. खाजगी विद्यापीठाच्या निर्मितीमुळे उच्च शिक्षण महागडे होईल परिणामी आर्थिकदृष्टया गरीब व दुर्बल वर्ग उच्च शिक्षणापासून वंचित राहील.
२. उच्च शिक्षणाचा दर्जा खालावे.
३. उच्च शिक्षणाच्या अभावी भारत २०२० पर्यत महासत्ता होण्यात प्रश्न निर्माण होईल.

३.

**उपाययोजना :–**

१. इतर राष्ट्राप्रमाणे भारतातीलही १८ते २४ या वयोगटातील सर्व विद्यार्थाना शिक्षण घेता आले पाहिजे जेनेकरून बेरोजगारी संख्या कमी होईल हयाची सुरूवात प्राथमिक शिक्षणापासून होणे आवश्यक आहे.
२. उच्च शिक्षण व पध्दतीत बदल होणे आवश्यक आहे.
३. उच्च शिक्षणावरील खर्चात वाढ व्हायला पाहिजे.
४. सामाजिक व आर्थिकदृष्टया दुर्बल वर्गातील विद्यार्थाना उच्चशिक्षण घेता येईल याची वेगळी व्यवस्था सरकारने करायला पाहिजे
५. प्रत्येकांनी आपला आत्मविश्वास वाढवायजला हवा.
६. उच्च शिक्षण हा एक अधिकार आहे. या शिवाय हा विशेष अधिकार व्हायला हवा. जो योग्यतेच्या आधारावर प्राप्त करायला हवा.

## संदर्भ

१. योजना फेंब्रुवारी २००२, नोव्हेबर २००२, जानेवारी २००३
२. कुरूक्षेत्र जानेवारी २००४
३. विद्यापीठ न्युज फेब्रुवारी २००४, डिसेबर २००३
४. दैनिक लोकसत्ता २००३
५. देशोन्नती –मंथन दि ३० जुलै २०१४
६. www.maharashtra convent.com